न्यास नोंदणी कार्यालय,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई,
धर्मादाय आयुक्त भवन,
२ रा मजला, ८३, डॉ. अॅनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०
फॅक्स २४९७६४२०

Public Trusts Registration Office,
Greater Mumbai Region, Mumbai,
Dharmadaya Ayukta Bhavan,
2nd Floor, 83, Dr. Annie Besant Road,
Worli, Mumbai - 400 018.
Tel No. 24935434 24935490
Fax No. 24976420.

---

जा.क्र./मालमत्ता/5754/२०२१ दिनांक : 18 AUG 2021

संदर्भ:- १) स्थलांतरण समिती दिनांक २८/०७/२०२१ रोजीच्या बैठकीचे इतिवत्त
२) सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई स्थलांतर समिती दि.१३/०८/२०२१ रोजीच्या बैठकीचे इतिवत्त.

## निविदा सूचना

याद्वारे, सर्व संबंधीताना सुचित करण्यात येते की, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय (बृहन्मुंबई) तळ मजला, पहिला व दुसरा मजला, धर्मादाय आयुक्त भवन, वरळी नाका, वरळी, मुंबई-१८ मधील सध्याचे वरील कार्यालयातुन सस्मीरा इन्स्टीयुट, सस्मीरा मार्ग, वरळी, मुंबई येथील इमारतीमध्ये स्थलांतरण करावयाचे आहे.

या कार्यालयातील सद्यस्थितीतील स्थालांतरणीय रेकॉर्ड (विविध अभिलेखा) व इतर किरकोळ वस्तु हे सस्मीरा इन्स्टीयुट, सस्मीरा मार्ग, वरळी, मुंबई येथील इमारतीत वापरण्याचे ठरविण्यात आले आहे. नमुद केलेले साहित्य धर्मादाय आयुक्त भवनातील उपरोल्लेखीत सध्याच्या जागेवरुन सस्मीरा येथील नवीन ठिकाणी पुन:श्च वापरता येईल उपयोगी पडेल या अवस्थेत काढून-स्थलांतरीत करणे करिता खालील अटी व शर्थी नुसार त्या मान्य असल्यास निविदा दिनांक २४/०८/२०२१ रोजी दुपारी ४:०० वाजेपर्यंत या कार्यालयातील मालमत्ता शाखेत सिलबंद लिफाफा जमा करावा. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

१. दरपत्रके देणारी संस्था किंवा कंपनी किंवा एकल व्यवसायीक नोंदणीकत असणे आवश्यक आहे.
२. सदरचा करार झाल्यानंतर या कार्यालयाचे संपुर्ण अभिलेखा Compactor मध्ये पुन:स्थलांतरीत होईपर्यंत व कार्यान्वयन सुरळीत होईपर्यंत हा करार निविदाकारास रद्द करता येणार नाही. या दरम्यान करावा लागणारा खर्च मनुष्यबळ, वाहतुक, इतर साहित्य व दुरुस्ती (लागल्यास) इत्यादींचा खर्च व कालावधी आपल्या निविदेमध्ये स्पष्टपणे नमुद करावेत.
३. या विषयी आणखी माहिती आवश्यक असल्यास तसेच उपकरणाची/साहित्याची पाहणी व माहिती घेणेस अधिक्षक (मालमत्ता) शाखा, दुसरा मजला, सा.न्या.नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई यांचेशी कार्यालयीन वेळेत (१० ते ४) संपर्क साधावा.
४. निविदा दाखल करणाऱ्या संस्था किंवा कंपनीचे Pan card व GST नोंदणीपात्र असणे आवश्यक आहे.
५. दरपत्रके ही GST सह देण्यात यावीत.

६. काम करणाऱ्या कारागिरांची जबाबदारी ही संबंधत संस्था/कंपनीची राहील तसे हमीपत्र सोबत द्यावे.
७. काम करणाऱ्या कारागीरांना संस्था किंवा कंपनीचे ओळखपत्र देणे आवश्यक आहे.
८. काम करणाऱ्या कारागीरावर देखरेख करण्याकरिता सुपरवायझर नेमण्याची जबाबदारी कंपनीची असेल.
९. वाहतुक करणाऱ्या गाडीचे सर्व कागदपत्रे R.C.Book, Insurance, PUC व गाडी चालकाचे License परवाना अद्यावत असणे आवश्यक आहे.
१०. पावसाचे दिवस असल्याने व महत्वाची कागदपत्रे असल्याने गाडीचे छप्पर बंदिस्त असणे आवश्यक आहे.
११. वापरण्यात येणारी गाडी हि केवळ ट्रक असणे आवश्यक आहे. आवश्यकतेनुसार टेम्पो तत्सम वाहन या विभागाच्या संबधित अधिकाऱ्यांच्या परवानगीने वापरता येईल.
१२. स्थलांतरणाचे काम करतांना कार्यालयातील कोणतीही वस्तु हलवितांना काळजीपूर्वक हालचाल करण्याच्या सुचना कामगारांना देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. नुकसान झाल्यास व त्याची भरपाई करावी लागल्यास देय रक्कमेतून कपात करण्यात येईल.
१३. निविदाकारांनी मागील ३ वर्षाचे इन्कम टॅक्स रिटर्नची प्रत सोबत जोडावी.
१४. सदर निविदा प्रक्रिया कोणतेही कारण न देता थांबवणे/ रदद करणे / पुढे ढकलणे / अटी व शर्तीमध्ये बदल करणे किंवा या संदर्भातील सर्व अधिकार हे सक्षम अधिकाऱ्यांकडे राखुन ठेवलेले आहेत.
१५. निविदाकारांच्या अटी व शर्ती असलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाही. तसेच या कार्यालयाच्या वर नमुद केलेल्या अटी व शर्ती मान्य नसलेल्या निविदा देखील मान्य केल्या जाणार नाहीत
१६. वर्क ऑर्डर दिल्यानंतर तात्काळ कामाला सुरुवात करणे बंधनकारक असेल.
१७. सदर निविदा प्रक्रियेत स्वारस्य असणाऱ्या पुरवठादारांनी त्यांच्या निविदा सिलबंद लिफाफ्यामध्ये सदर सुचना प्रसिध्द झाले नंतर दिनांक २४/०८/२०२१ रोजी दुपारी ४:०० वाजेपर्यंत मालमत्ता शाखा २ रा मजला सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई-१८ याथे जमा कराव्यात. त्या निविदा दुपारी ५:०० वाजता उघडण्यात येईल.

17/8/2021

स्थळ: मुंबई
दिनांक

अध्यक्ष, स्थलांतरण समिती,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
बृहन्मुंबई विभाग, मुंबई